महाराष्ट्र शासन

क्रमांक-एसटीसी-१०९५/प्र.क्र.१७४/का.१०
आदिवासी विकास विभाग,
मंत्रालय, विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक- १९ ऑक्टोबर, १९९५.

CR1995101901

प्रति,
विभागीय आयुक्त,
नाशिक विभाग, नाशिक.

विषय:- अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या जातीच्या प्रमाणपत्राच्या तपासणीबाबत.

उपरोक्त विषयासंदर्भात आपण सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांना लिहीलेले दि. १४.६.१९९५ चे अर्ध शासकीय पत्र क्र. मशा/कार्या-१/आ-३/५८३/९५ व उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनी आपणांस लिहीलेले दिनांक ७.८.९५ चे अर्ध शासकीय पत्र क्र. बीसीसी-१०९५/१६३५/ १६-ब, कृपया अवलोकन करावे.

२. संदर्भात अर्ध शासकीय पत्रात उपस्थित केलेल्या मुद्यासंदर्भात खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :-

| मुद्दा | अभिप्राय |
| --- | --- |
| १] उच्च न्यायालयातील याचिका क्र. २१४१/८७, दि. २३.११.८९ चे निकालपत्रात नमूद केल्याप्रमाणे ज्या अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांना दि. २९.१०.८०पूर्वी जातीचे दाखले देण्यात आलेले आहेत ते तपासण्याची आवश्यकता आहे काय ? व तशी तपासणी करण्याचे ह्या कार्यालयाला अधिकार आहेत काय ? किंवा तसे अधिकार नेमके कोणाला आहेत ? | रिट याचिका क्र. २१४१/८७, श्री. एन. डी. कोळी विरुध्द त्यांचे शासन याबाबत उच्च न्यायालयात दि. २३.११.८९ रोजी दिलेल्या निर्णयासंदर्भात स्पष्ट करण्यात येते की, समाजकल्याण विभागाच्या दि. २९.१०.८० च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना जातीची प्रमाणपत्रे देण्यासंदर्भात शासनाने सक्षम अधिका-यांना सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच उमेदवारास सक्षम अधिका-याने जातीचे प्रमाणपत्र दिले नाहीतर त्याविरुध्द अपिल दाखल करुन निर्णय देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना सदर शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत. अनुसूचित |

कृ.मा.प.

| मुद्दा | अभिप्राय |
| --- | --- |
| | जमातीच्या जातीच्या प्रमाणपत्रांच्या तपासणीबाबत शासनाने दि. २३.१.८५ अन्वये अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीची नियुक्ती केलेली असून दि. ३.६.९२ च्या शासन निर्णयान्वये नाशिक व नागपूर येथे दोन जादा प्रमाणपत्र तपासणी समित्या स्थापन केलेल्या आहेत. शासनाच्या दि. ८.३.८५ च्या शासन निर्णयान्वये दि. २९.१०.८० पूर्वी निर्गमित केलेल्या जातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी करून देण्याचे तसेच निर्णय " अवैध" असल्याचे सिद्ध झाल्यास जातीची प्रमाणपत्रे रद्द करून जप्त करण्याचे अधिकार अनुसूचित जमाती-जाती प्रमाणपत्र तपासणी समितीस दिलेले आहेत. |
| २] याचिका क्र. २१४१/८७, मधील निर्णय सरसकट सर्व केसेसना लागू ~~मह~~ करावा काय ? | कोणत्याही व्यक्तीची जात त्याच्या जन्मावरून [ By Birth ] ठरत असते. तेव्हा जातीचे प्रमाणपत्र कोणत्याही वर्षी दिलेले असलेतरी त्याची तपासणी बंधनकारक आहे. तसेच उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. २६१/८७ व ८८७/८७ यावर संयुक्तरित्या निर्णय देताना स्पष्टपणे नमूद केले आहे की, प्रत्येक प्रकरणी सादर केलेले पुरावे, वस्तुस्थिती व परिस्थितीजन्य पुरावा यांच्या अनुषंगाने तपासणी करावी म्हणजेच प्रत्येक प्रकरण गुणवत्तेनुसार तपासणे आवश्यक आहे. त्यामुळे रिट याचिका क्र. २१४१/८७, मधील निर्णय सर्व प्रकरणांना सरसकट लागू होणार नाही. |
| ३] जरी कर्मचा-यांच्या जातीच्या दाखल्या विरुद्ध तक्रार नसलीतरी सेवेत दाखल करतानाच जातीचे दाखले तपासून घेतल्या शिवाय त्यांना नेमणूक देऊ नये व हल्ली जे कर्मचारी कार्यालयात आहेत त्यांचे जातीचे दाखले ठराविक मुदतीत तपासून घ्यावेत. अशा प्रकारचे आदेश शासनाने फिरत एकदा reiterate करावे असे वाटते. | महाराष्ट्र लोकसेवा आयोग व विविध निवड मंडळे यांच्या मार्फत अनुसूचित जमातीसाठी राखीव असणा-या जागांवर एखाद्या उमेदवाराची नियुक्ती झाली तर त्या उमेदवाराच्या जातीच्या प्रमाणपत्राच्या तपासणीबाबत शासनाने दिनांक २३.१.८५, दि. १३.८.८५ व १८.४.८६ च्या शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत. जर उमेदवार त्याच्या जातीच्या दाव्या पुष्टयर्थ कागदपत्रे सादर करण्यास टाळाटाळ करीत असेल तर त्याचे जातीचे प्रमाणपत्र " अवैध" आहे असे गृहीत धरण्यात यावे, अशाही सूचना उपरोक्त शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या आहेत. तसेच दुय्यम सेवा निवड मंडळामार्फत अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर नियुक्त होणा-या उमेदवारांच्या जातीच्या ~~xxx~~ प्रमाणपत्रांच्या तपासणीबाबत शासनाने संकीर्ण- १०९०/३३२२४/ २२०/का-१०, दि. २४.१२.९० च्या पत्रान्वये संबंधित अधिका-यांना सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यामुळे अशा प्रकारच्या सूचना पुन्हा निर्गमित करण्याची आवश्यकता नाही. |

३. . .

३. अनुसूचित जमातींसाठी राखीव असणा-या जागांवर शासन सेवेत नियुक्त झालेल्या उमेदवारांच्या जातीच्या प्रमाणपत्रांच्या तपासणीबाबत उपरोक्त मार्गदर्शक सूचनांनुसार कृपया कार्यवाही करावी.

सही /-
[ सुगंधा वने ]
उप सचिव.

प्रत, माहितीसाठी अग्रेषित :-

सचिव [ महसूल ], महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
सचिव, सामान्य प्रशासन विभाग [ १६-ब ], मंत्रालय, मुंबई-३२.
सर्व विभागीय आयुक्त/ अपर विभागीय आयुक्त,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे,
सर्व जिल्हा दंडाधिकारी
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी.

सही/-
[ कृ. तु. आव्हाड ]
कक्ष अधिकारी.

---

क्रमांक- आस्था-1 अ.ज/अ.जा/ई-७१५४
पुणे दि. १७१३५
27 DEC 1995

उपसंभूअ (सर्व) यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाही साठी रवाना

शिरे
१७/१२/९५
कळी

[illegible] १९/१२
का.ई-2

[illegible]

ज.उ.आ. पुणे
यांचेकरिता

प्रत - कार्य ई-४, ई-५ ई-६ ज.आ.पुणे कार्यालय

DISPATCHED
ON 27 DEC 1995
14616